


दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २०८ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) गुरूवार २७/०८/२०२६ । पाने - ६




# संजय काळे यांचे अर्धनग्न पायी आंदोलन




युवावार्ता (प्रतिनिधी)

राहाता- गेल्या १५ ते २० वर्षांपासून अत्यंत संथगतीने सुरू असलेल्या आणि अनेक निष्पाप नागरिकांचा बळी घेणाऱ्या नगर-कोपरगाव रस्त्याचे काम पूर्ण करण्यात अपयशी ठरलेल्या प्रशासनाच्या निषेधार्थ कोपरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते संजय काळे यांनी अनोखे आणि आक्रमक आंदोलन छेडले आहे. या महामार्गाच्या दुरावस्थेकडे शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी सावळीविहीर फाटा ते अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय असा सुमारे ७० किलोमीटरचा अंतर कापण्यासाठी अर्धनग्न पायी पदयात्रा सुरू केली आहे.

२५ ऑगस्ट रोजी सावळीविहीर फाटा येथून या आंदोलनाची सुरुवात झाली. सावळीविहीर ते राहाता असा १० ते १५ किलोमीटरचा प्रवास करून संजय काळे राहाता येथील छत्रपती शिवाजी चौकात पोहोचले. या वेळी शहरातील नागरिकांनी त्यांचे स्वागत करत आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिला. राहाता शहर मनसेचे शहराध्यक्ष विजय मोगले यांनी काळे यांचा सत्कार करण्याचा प्रयत्न केला असता, मी कोणाचाही सत्कार स्वीकारणार नाही किंवा कुठेही भेट देणार नाही. पाठिंबा द्यायचा असेल तर माझ्यासोबत दोन पावले चला, हाच माझ्यासाठी खरा सत्कार असेल, असे सांगत त्यांनी सत्कारास नकार दिला. आपली भूमिका स्पष्ट करताना संजय काळे म्हणाले, गेल्या पंधरा-वीस वर्षांत या रस्त्यावर अनेक निष्पाप लोकांचे बळी गेले. रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली ब्रिटिशकालीन वटवृक्ष तोडून रस्ता बोडखा करण्यात आला. या काळात राजकारणात मंत्री बदलले, सरकारे बदलली, राजकीय पिढ्या बदलल्या; मात्र रस्त्याची दुरवस्था संपली नाही. जिल्ह्याचा रस्ता नागडाच राहिला, त्यामुळे जोपर्यंत आपण नागडे होत नाही तोपर्यंत शासन जागे होणार नाही. गांधीजींच्या आंदोलनाचा हाच मार्ग योग्य आहे. जनतेची लाज म्हणून फक्त कंबर झाकून हा नागड्या जिल्ह्याचा आ प्रतिनिधी नागडाच चालणार. संजय काळे यांच्या या भूमिकेला पाठिंबा दर्शवत मनसेचे शहराध्यक्ष विजय मोगले व हरूण शेख यांनी स्वतःचे शर्ट काढून या अर्धनग्न आंदोलनात सक्रिय सहभाग नोंदवला.

# अंगणवाड्यांमधील पोषण आहार तपासा; मंत्र्यांचे कारवाईचे निर्देश

## अंगणवाडी सेविकेचा व्हिडिओ, तुकाराम मुंढेंचा प्रभाव, दिपकेंच्या शाळा तपासणी मोहिमेचा धसका?

मुंबई (वृत्तसंस्था)

अंगणवाडीतील चिमुकल्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या गुणवत्तेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, महिला व बालविकास विभागाने आता याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील एका अंगणवाडी सेविकेने समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओत पोषण आहाराच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केल्यानंतर या प्रकरणाची दखल घेतली गेली आहे. त्यानंतर महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी राज्यातील अंगणवाड्यांमध्ये पोहोचणाऱ्या पोषण आहाराची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

बालकांच्या पोषणाच्या बाबतीत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असा स्पष्ट संदेश देत पुढील ४८ तासांत राज्यातील सर्व अंगणवाड्यांची प्रत्यक्ष तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे पोषण आहाराच्या पुरवठ्यापासून तो बालकांच्या ताटापर्यंत पोहोचेपर्यंतच्या संपूर्ण व्यवस्थेवर प्रशासनाची नजर राहणार आहे.

आंबेगाव तालुक्यातील अंगणवाडी सेविकेने समाजमाध्यमांवर प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओमुळे पोषण आहाराच्या गुणवत्तेचा मुद्दा चर्चेत आला. व्हिडिओमध्ये अंगणवाडीत आलेला पांढरा वाटाणा आणि भरडा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असल्याचा दावा करण्यात आला. पांढरा वाटाणा आदल्या दिवशी भिजत ठेवून दुसऱ्या दिवशी कुकरमध्ये तब्बल नऊ ते दहा शिट्ट्या करूनही व्यवस्थित शिजत नसल्याचे सेविकेने सांगितले. भरड्याचीही अशीच अवस्था असल्याचे



नमूद करत, 'असा आहार लहान मुलांना कसा द्यायचा?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या व्हिडिओनंतर अंगणवाड्यांमधील पोषण आहाराच्या गुणवत्तेबाबत प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित झाले. समाजमाध्यमांवरून समोर आलेल्या या प्रकाराची दखल घेत आता थेट अंगणवाडी पातळीवर जाऊन वस्तुस्थिती तपासण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.महिला व बालविकास विभागाच्या निर्देशानुसार, प्रत्येक बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिनस्त असलेल्या मुख्यसेविका व पर्यवेक्षिकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व अंगणवाड्यांना प्रत्यक्ष भेट देऊन पोषण आहाराची तपासणी करायची आहे. आहाराचा दर्जा, सुरक्षितता, साठवणूक आणि बालकांना देण्यायोग्य स्थिती यांची बारकाईने पडताळणी केली जाणार आहे.

तपासणीदरम्यान एखाद्या अंगणवाडीत पोषण आहार निकृष्ट, खराब अथवा बालकांच्या सेवनासाठी अयोग्य आढळल्यास तो तातडीने संबंधित पुरवठादाराकडून बदलून घेण्याची जबाबदारी प्रशासनाची राहणार आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री तपासणी न करता प्रत्यक्ष अंगणवाडीपर्यंत पोहोचून आहाराची गुणवत्ता तपासण्यावर भर देण्यात आला आहे. (पान २ वर)

# तामिळनाडूत शिक्षकांची टीईटीमधून कायमस्वरूपी सुटका होणार ?

## महाराष्ट्रातील शिक्षकांच्या मागणीला मिळणार बळ; केंद्राकडे कायद्यात बदलाची शिफारस

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- तामिळनाडूतील २३ ऑगस्ट २०१० पूर्वी नियुक्त झालेल्या सरकारी शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटीमधून कायमस्वरूपी सूट देण्याच्या मागणीने आता वेग घेतला आहे. या शिक्षकांची दीर्घकाळाची सेवा, अनुभव आणि निवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेले वय लक्षात घेऊन त्यांना टीईटीची अट लागू करू नये, असा ठराव तामिळनाडू विधानसभेत मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील टीईटीमधून सूट मिळावी, या मागणीलाही नव्याने बळ मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तामिळनाडूचे शालेय शिक्षण मंत्री राजमोहन यांनी विधानसभेत हा प्रस्ताव मांडला. २३ ऑगस्ट २०१० पूर्वी तत्कालीन नियम व पात्रता निकषांनुसार नियुक्त झालेल्या शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होण्याच्या अटीतून 'पूर्ण आणि कायमस्वरूपी' सूट देण्यात यावी, अशी मागणी या ठरावातून केंद्र सरकारकडे करण्यात आली आहे. यासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ मधील कलम २३ मध्ये आवश्यक सुधारणा करावी, तसेच राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडून याबाबत स्पष्ट अधिकृत अधिसूचना अथवा परिपत्रक जारी करावे, अशी विनंतीही तामिळनाडू विधानसभेने केंद्राकडे केली आहे.

तामिळनाडू सरकारच्या म्हणण्यानुसार, तब्बल १५ ते २० वर्षे सेवा बजावलेल्या तसेच निवृत्तीच्या मार्गावर असलेल्या




शिक्षकांना आता टीईटी परीक्षा देण्याची सक्ती केल्यास त्यांच्या नोकरीच्या सुरक्षिततेवर आणि उपजीविकेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे त्यांच्या प्रदीर्घ सेवाकाळाचा आणि अध्यापनाच्या अनुभवाचा विचार करून टीईटीमधून सूट देणे आवश्यक असल्याचे सरकारने म्हटले आहे. या शिक्षकांना केवळ सेवेत कायम ठेवण्यापुरतेच नव्हे, तर पदोन्नतीच्या संधी आणि इतर सेवासुविधांमध्येही अडथळा निर्माण होऊ नये, अशी भूमिका तामिळनाडू सरकारने घेतली आहे.

दरम्यान, डीएमकेचे व्हीप ई. व्ही. वेलू यांनी केंद्र सरकारने आवश्यक कायदेशीर बदल केल्यानंतरच टीईटीमधून सूट देणे शक्य होईल, असे स्पष्ट केले आहे. या संपूर्ण प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयाच्या १ सप्टेंबर २०२५ रोजीच्या निर्देशांची पार्श्वभूमी आहे. शिक्षकांच्या पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक असल्याचे निर्देश न्यायालयाने दिले होते. त्यामुळे प्रदीर्घ सेवा केलेल्या शिक्षकांना टीईटीच्या अटीतून सूट देण्याचा मुद्दा आता कायदेशीर आणि प्रशासकीय पातळीवर महत्त्वाचा ठरला आहे.

### महाराष्ट्रातील शिक्षकांच्या मागणीला मिळणार बळ

**तामिळनाडूप्रमाणेच महाराष्ट्रातील अनेक शिक्षक संघटनांकडूनही टीईटीच्या अटीतून सूट देण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यामुळे तामिळनाडू विधानसभेने केंद्राकडे केलेल्या शिफारशीवर केंद्र सरकारने सकारात्मक निर्णय घेतल्यास महाराष्ट्रातील शिक्षकांच्या मागणीला मोठे बळ मिळण्याची शक्यता आहे. तामिळनाडूच्या या ठरावाकडे महाराष्ट्रातील शिक्षकांचे लक्ष लागले असून, 'दीर्घ सेवा की पुन्हा टीईटी?' या प्रश्नावर आता केंद्र सरकार काय निर्णय घेते, याची उत्सुकता निर्माण झाली आहे.**












# प्रत्येक कृतीत ईश्वरभाव जागवण्याचा संदेश ज्ञानेश्वरीत : डॉ. संजय मालपाणी

## राजस्थान युवक मंडळाची व्याख्यानमाला; 'कर्माकडून कृतार्थतेकडे'चा भावस्पर्शी प्रवास



**संगमनेरच्या सांस्कृतिक इतिहासात गौरवाने उल्लेख व्हावा, अशी ज्ञानरंजन आणि भक्तीची परंपरा राजस्थान युवक मंडळाने जपली आहे. दरवर्षी श्रावणमासात आयोजित होणारी ही व्याख्यानमाला संगमनेरकरांसाठी अध्यात्मिक आणि वैचारिक पर्वणी ठरते. यंदाच्या भक्तिरसपूर्ण सोहळ्याचा शुभारंभ कीर्तनचंद्रीका रोहिणी परांजपे यांच्या 'विश्वस्वधर्मे सूर्ये पाहो' या विषयावरील दोन दिवसीय भक्तिसोहळ्याने झाला. त्यानंतर सोमवार व मंगळवारी गीता विशारद् डॉ.संजय मालपाणी ज्ञानेश्वरीच्या तिसर्या व चौथ्या अध्यायाचे निरुपण करीत आहेत. भक्ती, ज्ञान आणि जीवनविचार यांची त्रिवेणी संगमनेरच्या सांस्कृतिक जीवनाला अधिक समृद्ध करणारी आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - कर्म म्हणजे केवळ जगण्याची धावपळ नव्हे, कर्तव्य म्हणजे केवळ जबाबदारीची पूर्तता नव्हे; तर आपल्या वाट्याला आलेले प्रत्येक कर्म परमेश्वराला अर्पण करण्याची वृत्ती म्हणजेच कर्मयोग. कर्म करताना त्याच्या फळाची आसक्ती मनाला बांधून ठेवू नये आणि आपल्या प्रत्येक कृतीतून अंतःकरणातील ईश्वराशी संवाद साधत राहावे, हा संत ज्ञानेश्वर माउलींच्या ज्ञानेश्वरीतील कर्मयोगाचा गाभा आहे. याच अत्यंत सूक्ष्म आणि जीवनाला दिशा देणाऱ्या विचाराचा रसाळ, अभ्यासपूर्ण आणि भावस्पर्शी उलगडा गीता विशारद् डॉ. संजय मालपाणी यांनी केला आणि 'कर्माकडून कृतार्थतेकडे' या प्रवासात उपस्थित संगमनेरकरांना अंतर्मुख केले.

राजस्थान युवक मंडळाच्यावतीने आयोजित मनःशांती आणि जीवनविकास व्याख्यानमालेच्या तिसऱ्या पुष्पात डॉ.मालपाणी ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या व चौथ्या अध्यायाचे निरुपण करीत होते. यंदाच्या व्याख्यानमालेत भक्ती, ज्ञान आणि कर्म या जीवनाच्या तीन महत्त्वाच्या अंगांना स्पर्श करणारा विचारसोहळा रंगत असून, डॉ. मालपाणी यांच्या निरुपणाचा पहिला दिवस उपस्थितांसाठी अध्यात्मिक अनुभूती देणारा ठरला.

आपल्या निरुपणातून कर्मयोग समजावताना डॉ. मालपाणी यांनी कर्मापासून पळून जाण्याऐवजी कर्मातच साधना शोधण्याचा ज्ञानेश्वरीचा मार्ग स्पष्ट केला. माणसाच्या आयुष्यात कर्म अटळ आहे. श्वास घेतो तोपर्यंत काही ना काही कृती आपल्या हातून घडतच असते. प्रश्न कर्म करायचे की नाही, हा नसून कर्म कोणत्या भावनेने करायचे हा आहे. स्वार्थ, अहंकार आणि फळाची अपेक्षा यापासून मुक्त होऊन कर्तव्यकर्म परमेश्वराच्या चरणी अर्पण करण्याची वृत्ती विकसित झाली, तर सामान्य कर्माचे रुपांतर कर्मयोगात होते, हा विचार त्यांनी अत्यंत सहजपणे श्रोत्यांसमोर मांडला.

ज्ञानेश्वरीच्या तिसऱ्या अध्यायात कर्मयोगाचा हा विचार माउलींनी विलक्षण जीवनस्पर्शी पद्धतीने मांडला आहे. कर्म सोडून देणे म्हणजे संन्यास नव्हे; उलट आपल्या वाट्याला आलेले कर्म निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि निरपेक्ष भावनेने करणे, हाच खरा संन्यासाचा अर्थ आहे. मनुष्याने आपल्या इंद्रियांना, मनाला आणि बुद्धीला योग्य दिशेने वळविले तर संसारातील प्रत्येक व्यवहार साधनेचे माध्यम होऊ शकतो. घर, व्यवसाय, समाज, नाती आणि जबाबदाऱ्या यांच्यापासून दूर जाण्यात अध्यात्म नाही; त्या सर्वांच्या मध्यभागी राहून अंतःकरणात ईश्वराला जागे ठेवण्यातच अध्यात्माचे खरे सौंदर्य आहे, अशी भावपूर्ण मांडणी केली.

याच विचाराला अधिक व्यापक आध्यात्मिक अर्थ देताना त्यांनी प्रारंभी केलेल्या प्रार्थनेतून कर्मयोगाची प्रत्यक्ष अनुभूतीच जणू उपस्थितांसमोर उभी केली. 'कर प्रणाम तेरे चरणों में, लगता हूँ अब तेरे काज' या भावनेतून आपले आजचे कर्म स्वतःच्या अहंकारासाठी नसून परमेश्वराच्या कार्यासाठी आहे, अशी अंतर्मनाची तयारी व्हावी, असा संदेश त्यांनी दिला. 'मला शक्ती दे, मला ताकद दे; आजचे काम तुझ्या आज्ञेने करण्यासाठी मी निघालो आहे,' हा भाव मनात असेल तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक कर्तव्य अधिक अर्थपूर्ण होते, असे त्यांनी सांगितले.

अंतःकरणात स्थित असलेल्या परमेश्वराने आपल्या मनाची बागडोर धरावी, चंचल मनाला सावध ठेवावे आणि वाईट वासनांचा उदय होताच अंतर्मनातील विवेक जागा व्हावा, ही प्रार्थनेतील भावना त्यांनी कर्मयोगाशी जोडली. कर्म बाहेर घडते; मात्र कर्मामागची भावना आत जन्म घेते. त्यामुळे बाह्य कृतीपेक्षा अंतःकरणाची शुद्धता महत्त्वाची आहे, हा विचार त्यांच्या निरुपणातून अधोरेखित झाला. 'तू ही सर्वत्र व्याप्त हरी, तुझमें यह सारा संसार' या भावनेतून प्रत्येक जीवामध्ये परमेश्वराचे दर्शन घेण्याचा संदेशही त्यांनी दिला. आपले कर्तव्य किती मोठे आहे यापेक्षा ते कोणत्या भावनेने केले जाते, यावर त्याचे आध्यात्मिक मूल्य ठरत.

या निरुपणादरम्यान ज्ञानेश्वरीतील ओव्यांना लाभलेली संगीताची सुरेल साथ वातावरणाला आणखी भक्तिमय करणारी ठरली. माउलींच्या शब्दांचा अर्थ, त्यातील भाव आणि त्यामागील जीवनदृष्टी यांची सांगड संगीताच्या माधुर्याशी घातली गेल्याने व्याख्यानाचे रुप केवळ बौद्धिक चिंतनापुरते मर्यादित राहिले नाही. उपस्थित भाविक जणू त्या ओव्यांच्या भावविश्वातच हरवून गेले होते. ज्ञानेश्वरीतील शब्द कानावर पडत होते, संगीत मनाला स्पर्श करीत होते आणि कर्मयोगाचा विचार अंतर्मनात रुजत होता. दोन दिवसांच्या या निरुपणमालेच्या पहिल्याच भागातच संगमनेरकर भाविक भक्तिरसात अक्षरशः चिंब न्हाऊन निघाले.

व्याख्यानमालेस राजस्थान युवक मंडळाचे अध्यक्ष मनीष मालपाणी, कार्याध्यक्ष सागर मणियार, उपाध्यक्ष कल्पेश मर्दा, शुभम राठी, दर्शन भंडारी, ओम इंदाणी आदींसह भाविक श्रोते मो×या संख्येने उपस्थित होते. मंडळाचे सचिव कृष्णा आसावा यांनी वक्त्यांचा परिचय करुन देत सूत्रसंचालन व आभार मानले.

# स्टोन क्रशरच्या मनमानीला चाप कधी ?

## ग्रामस्थांच्या तक्रारींकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात सुरू असलेल्या विविध स्टोन क्रशर व्यवसायांमुळे परिसरातील ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची भावना वाढत आहे. क्रशरमधून होणारे उत्खनन, दगडांची वाहतूक, धुळीचे प्रदूषण तसेच जड वाहनांची वर्दळ यामुळे ग्रामस्थ त्रस्त असल्याचे चित्र आहे. संबंधित यंत्रणांनी या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन नियमांचे उल्लंघन करणाऱ्या क्रशर चालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

स्टोन क्रशर व्यवसायासाठी आवश्यक परवानग्या, रॉयल्टी, उत्खननाची मर्यादा आणि वाहतुकीचे नियम यांचे पालन होणे अपेक्षित आहे. मात्र काही ठिकाणी नियमांची पायमल्ली होत असल्याच्या तक्रारी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहेत. विशेषतः क्रशर परिसरातून होणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे गावातील रस्त्यांवर धूळ उडत असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर त्याचा परिणाम होत असल्याचे सांगण्यात येते.

काही ठिकाणी रॉयल्टी भरली नसलेल्या गौण खनिजाची वाहतूक होत असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. तसेच क्षमतेपेक्षा अधिक उत्खनन आणि नियमबाह्य वाहतूक होत असल्यास त्याची तपासणी करून संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. प्रशासनाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती तपासावी, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

स्टोन क्रशर संदर्भातील तक्रारींवर महसूल, पोलीस तसेच संबंधित विभागांनी संयुक्तपणे कार्यवाही करणे गरजेचे आहे. तहसीलदार व संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारींची दखल घेऊन क्रशरची तपासणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, क्रशर मालकांकडून रॉयल्टी भरण्याची प्रक्रिया पारदर्शक असावी तसेच वाहतूक करणाऱ्या वाहनांची कागदपत्रे व परवानग्यांची तपासणी नियमितपणे व्हावी. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत असल्याने संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष घालून स्टोन क्रशर व्यवसायाला नियमांच्या चौकटीत आणावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.बातमीसोबतचा फोटो: आपण पाठवलेला स्टोन क्रशरचा फोटोच या बातमीसोबत वापरता येईल.

## प्राजक्ताचा सडा... धरतीचे सुंदर लेणे!



पावसाच्या थेंबांनी न्हालेल्या प्राजक्ताच्या शुभ्र फुलांनी धरतीवर मनमोहक सडा पसरला असून, निसर्गाचे हे देखणे रूप लक्ष वेधून घेत आहे. (छाया – प्रा. सुशांत सातपुते)

# अकोले येथे श्रावण मासानिमित्त गुरुवारी विशेष संत सत्संग सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी) अकोले-

अकोले शहरात प्रथमच स्वामीनारायण बीएपीएस संस्थेच्या संतांचे मंगलमय आगमन होत असून, श्रावण मासाच्या पावन पर्वानिमित्त स्वामीनारायण बीएपीएस संस्थेच्या संतांच्या सान्निध्यात भव्य संत सत्संग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, २७ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६.३० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत विठ्ठल लॉन्स (देवठाण रोड), अकोले येथे हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती आयोजक केशव बाबा चौधरी यांनी दिली.

यावेळी दुपारी ४ ते ६ वाजेपर्यंत अकोले शहरातून कार्यक्रमस्थळापर्यंत सवाद्य संतांची मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या संत सत्संग मेळाव्यात पूज्य संत श्रीजीकीर्तन स्वामी (अध्यापक संत, संस्कृत साहित्याचार्य, सारंगपूर, गुजरात), महाव्रत स्वामीजी (कोषाध्यक्ष, कोठारी संत, नाशिक), पूज्य संत अमरनिलय स्वामीजी, नाशिक आणि पूज्य संत गौरव मुनी स्वामीजी, नाशिक हे संतवृंद उपस्थित राहणार आहेत. संतांच्या पावन सान्निध्यात सत्संग, भक्ती, संस्कार आणि आध्यात्मिक विचारांचा मंगलमय अनुभव घेण्याची ही सुवर्णसंधी आहे. कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संतांच्या विचारांचा व सत्संगाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वागताध्यक्ष आमदार डॉ. किरण लहामटे, आयोजक योगी केशव बाबा चौधरी व स्वामीनारायण बीएपीएस भक्त परिवार, अकोले यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# डोळासणे परिसरातील वीजप्रश्नाला अखेर मिळाला दिलासा

## आ. खताळांचा पाठपुरावा, वीजजोडणीच्या कामांना सुरुवात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर तालुक्यातील पठार भागातील डोळसणे परिसरातील नागरिकांच्या वीजजोडणीच्या प्रलंबित प्रश्नाला अखेर मार्ग मिळाला आहे. नागरिकांना वीजजोडणी मिळावी यासाठी आमदार अमोल खताळ पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, परिसरातील विविध वीजजोडणीच्या कामांसाठी सुमारे ९० लाख १ हजार ९९७ रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्याने जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत ओटीएसपी योजनेतून हा निधी उपलब्ध झाला आहे. निधी मंजूर झाल्यानंतर संबंधित कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

डोळसणे परिसरातील अनेक कुटुंबांना वीजजोडणीअभावी विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी हा प्रश्न आमदार अमोल खताळ यांच्याकडे मांडला होता. आ. खताळ यांनी गांभीर्याने दखल घेत शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला.

अखेर निधी उपलब्ध झाल्याने वीजजोडणीची कामे सुरू झाली असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. वर्षानुवर्षे प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. वीजजोडणीची कामे पूर्ण झाल्यानंतर डोळसणे परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनासह शेती व इतर कामांनाही मोठी मदत होणार आहे.

# राजापूरमध्ये दत्त मंदीर जिर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील राजापूर खंदक आखाडा येथील श्री दत्त मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त त्रिदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार दि. २८ ऑगस्ट ते सोमवार दि. ३१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडणार आहेत.

शुक्रवारी सकाळी मूर्ती व कलशाची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून, त्यानंतर ह.भ.प. बाबासाहेब महाराज वाणी (झरेकर) यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाला सुरुवात होईल. शनिवारी ह.भ.प. सागर महाराज दिंडे (नाशिक) यांचे कीर्तन होणार आहे. रविवारी मूर्ती स्थापना व कलशारोहणाचा मुख्य सोहळा होणार असून, सकाळी ६ ते ८ या वेळेत ह.भ.प. धैर्य दिनानाथ महाराज ऋषिकेश यांच्या शुभहस्ते महापूजा संपन्न होईल. त्यानंतर ह.भ.प. शरद महाराज ढवळे (काकडवाडी) यांचे कीर्तन होणार आहे. सोमवारी सायंकाळी ७ ते ९ या वेळेत ह.भ.प. राजेंद्र महाराज सदगीर (संगमनेर) यांचे कीर्तन होईल. त्यानंतर काला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यासाठी विविध भजनी मंडळे, वारकरी संस्था तसेच परिसरातील भाविकांचे सहकार्य लाभत असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पान १ वरून - अंगणवाड्यांमधील पोषण आहार तपासा...

अंगणवाडीतील पोषण आहाराचा मुद्दा पुढे येत असतानाच, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबतच्या कठोर भूमिकेचीही चर्चा सुरू झाली आहे. अन्नाची गुणवत्ता, सुरक्षितता आणि नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड न करण्याची प्रशासकीय भूमिका यामुळे या प्रकरणाकडेही गांभीर्याने पाहिले जात आहे.

दरम्यान, शिक्षण क्षेत्रात अभिजित दिपके यांनी राबविलेल्या शाळा तपासणी मोहिमेमुळेही शैक्षणिक संस्थांमधील प्रत्यक्ष परिस्थिती प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा मुद्दा चर्चेत आला आहे. त्यामुळे समाजमाध्यमांवरून समोर येणारे व्हिडिओ, अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष तपासण्या आणि प्रशासनातील काही अधिकाऱ्यांची कठोर कार्यपद्धती या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून अंगणवाडीतील पोषण आहाराची थेट तपासणी करण्याचा मंत्र्यांचा निर्णय झाला असावा, अशी चर्चा प्रशासकीय वर्तुळात सुरू आहे.

मात्र, या निर्णयामागे नेमका कोणता घटक निर्णायक ठरला, याबाबत अधिकृत स्पष्टीकरण नसले तरी एका सेविकेच्या व्हिडिओने उपस्थित केलेल्या प्रश्नाची शासनाने गंभीर दखल घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट होत आहे. आता ४८ तासांच्या तपासणीत राज्यभरातील अंगणवाड्यांमध्ये पोहोचणाऱ्या पोषण आहाराचा खरा दर्जा कितपत उघड होतो, याकडे पालकांसह सर्वांचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# ब्राह्मणवाड्यात विविध प्रश्नांवरून रास्ता रोको

## आश्वासन न मिळाल्याने आंदोलनाचा इशारा कायम



अकोले - तालुक्यातील ब्राह्मणवाडा येथे अवैध दारूविक्रीला आळा घालावा, गावातील तसेच परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, जलजीवन मिशनच्या कामांचा दर्जा सुधारावा आणि संबंधित दोषी ठेकेदारांवर कारवाई करावी, या विविध मागण्यांसाठी ग्रामस्थांनी सोमवारी रास्ता रोको आंदोलन केले. यानंतर ग्रामस्थांनी बेमुदत उपोषण सुरू केले. प्रशासनाने मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार ब्राह्मणवाडा गावात दारूबंदीचा निर्णय असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने अवैध दारूविक्री सुरू आहे. गावातील अपूर्ण रस्त्यांची कामे गेल्या काही वर्षांपासून रखडलेली असून राज्य मार्ग क्रमांक २३ व ओतूर -ब्राह्मणवाडा मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. यापूर्वीही ग्रामस्थांनी विविध ठिकाणी पायी आंदोलन करून तहसील प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र मागण्यांवर ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप करण्यात आला.

आंदोलनादरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी मागण्यांबाबत ठोस लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी करण्यात आली. मात्र समाधानकारक आश्वासन न मिळाल्याने उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला. दारूविक्रीमुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात सापडत असल्याने हा प्रश्न केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित नसून सामाजिक आरोग्याचा प्रश्न असल्याचे आंदोलकांनी सांगितले. रस्त्यांची दुरवस्था, रखडलेली विकासकामे आणि दारूबंदीची अपुरी अंमलबजावणी यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. प्रशासनाने ग्रामस्थांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली. मागण्यांवर ठोस निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला.

# महसूल पथकाची चाहूल लागताच वाळू तस्कर पसार, ७ लाखांचा मुद्देमाल जप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिबलापूर -संगमनेर तालुक्यातील दाढ खुर्द व चणेगाव शिवारात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज वाहतुकीविरोधात महसूल विभागाने कारवाईचा धडाका सुरू केला आहे. महसूल पथकाकडून तपासणी सुरू असताना कारवाईची चाहूल लागताच एका टिपर चालकाने वाहनासह घटनास्थळावरून पलायन केल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून सुमारे ७ लाख ६ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



दि. २३ ऑगस्ट रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास पिंपरणे मंडळाचे अधिकारी अमृत हिले यांच्या पथकातील सागर लांडे, रोहन गायकवाड आणि खविंद्र पानसरे हे दाढ खुर्द परिसरात गस्त घालत होते. यावेळी या शिवरातीतून गुरुकृपा डेअरीजवळ पिवळ्या रंगाचा अशोक लेलँड कंपनीचा टिपर येताना पथकाला दिसला. संशय आल्याने पथकाने वाहन थांबविण्याचा प्रयत्न केला.

प्राथमिक पाहणीत टिपरच्या नंबर प्लेटवर खोडखाड केल्याचे निदर्शनास आले. तसेच वाहनामध्ये सुमारे दोन ब्रास अवैध वाळू भरलेली असल्याचे आढळून आले. महसूल पथकाने वाहनचालकाला थांबण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन काही अंतरावर थांबवून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला.

दरम्यान, पथकाने वाहनाचा पाठलाग करून तपासणी केली. वाहनचालक व मालकाविरुद्ध कारवाई करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अवैध वाळू वाहतुकीला आळा घालण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

महसूल विभागाच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध गौण खनिज वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. अशा प्रकारच्या अवैध वाहतुकीवर यापुढेही कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यास प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेत राष्ट्रीय स्तरावर प्रथम पुरस्कार प्राप्त



अहिल्यानगर- भारत सरकारच्या अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयाद्वारे नवी दिल्ली येथील 'इंडिया हॅबिटॅट सेंटर' येथे दिनांक २४ आणि २५ ऑगस्ट २०२६ रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय 'PMFME कॉन्क्लेव्ह'चे (परिषदेचे) भव्य आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्ह्याला प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत केंद्रस्तरावर उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालयमार्फत पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. हा पुरस्कार अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी स्वीकारला. या वेळी राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अविनाश जोशी, केंद्रीय सचिव, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, देवेश देवाल, सहसचिव, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्रालय, कृषि संचालक विजयकुमार आवटे हे उपस्थित होते.

जिल्ह्यात या योजनेअंतर्गत १हजार ८५५ अन्न प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात आले असून, अहिल्यानगर जिल्हा कृषी विभागाच्या ह्या अतुलनीय कामगिरी मुळे जिल्ह्याचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला आहे. पुरस्कारांच्या वर्गवारीत महाराष्ट्र राज्याचा देशात प्रथम क्रमांक येण्यात अहिल्यानगर जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांसाठी सरासरी प्रकल्प कर्ज ११.६८ लाख रुपये व सरासरी ४.२७ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे. विशेष म्हणजे अहिल्यानगर जिल्ह्याच्या ह्या कामगिरी मुळे असंघटित क्षेत्रातील अन्न प्रक्रियादार हे संघटित क्षेत्रात आल्याने बँक कर्ज उपलब्ध होण्यास व शासकीय योजनांचा लाभ घेता आला आहे. अन्न प्रक्रिया उद्योग उभारणीने रोजगारांची निर्मिती होत आहे. यामुळे जिल्ह्यात ७९ कोटी रुपयांचे अनुदान अन्नप्रक्रिया उद्योगांना वितरित झाले असल्याचे प्रतिपादन सुधाकर बोराळे यांनी केले. तसेच, जिल्ह्यात जास्तीत जास्त उद्योजक तयार करून तरुणासाठी रोजगाराच्या संधी जिल्ह्यातच उपलब्ध होत आहे असे त्यांनी नमूद केले. पालकमंत्री मा ना. राधाकृष्ण विखे पाटील जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व बँका, कृषी विभागातील अधिकारी - कर्मचारी व जिल्हा संसाधन व्यक्तींनी संघभावनेने काम केले. परिणामी, जिल्ह्याने केंद्र शासनाच्या स्तरावर पुरस्कार मिळवला.

# न्या. सुनील शुक्रे यांनी लोकायुक्त पदाची घेतली शपथ



छाया - पराग कुलकर्णी, मुंबई

मुंबई (वृत्तसंस्था)

मुंबई उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी राज्याच्या लोकायुक्त संस्थेच्या अध्यक्ष पदाची शपथ घेतली. लोकभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी सोहळ्यात राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी न्या. सुनील शुक्रे यांना पदाची शपथ दिली. शपथविधी सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, मावळते लोकायुक्त न्या. विद्यासागर कानडे, मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे, महाराष्ट्र लोकायुक्त संस्थेचे अन्य सदस्य तसेच मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. न्या. सुनील शुक्रे यांनी मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम करताना विविध महत्त्वाच्या प्रकरणांमध्ये न्यायदान केले आहे.

।। तमसो मा ज्योतिर्गमय ।।

रजि. नं. ए. एन. आर/ एस. एन. आर./ आर. एस. आर./ (सी. आर.) ८४५ आर. दि. ३१/५/९४

**जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित**

गणेशनगर, पुंड कॉम्पलेक्स, नाशिक रोड, संगमनेर, जि. अहिल्यानगर

**वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

**जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, संगमनेर जि. अहिल्यानगर** या संस्थेची **वार्षिक सर्व साधारण सभा शनिवार दि. २९/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक १०.०० वा. मातोश्री मंगल कार्यालय, अकोले बायपास रोड, गणेशनगर, संगमनेर** येथे संस्थेचे विद्यमान चेअरमन मा. श्री. दिलीप सहदेव पुंड यांचे अध्यक्षतेखाली पुढील विषयांचा विचार विनिमय करणे करीता आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**सभेपुढे येणारे विषय**

१. मा. अध्यक्षसाहेब यांना अध्यक्षस्थान स्विकारणेस विनंती करणे.
२. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसेडिंग वाचून कायम करणे.
३.सन २०२५-२६ या अखेरचे ताळेबंद पत्रक, नफा- तोटा पत्रक, व्यापारी पत्रक वाचून मंजुर करणे.
४. सन २०२६ -२७ या सालाकरीता अंदाज पत्रकास मान्यता देणे.
५. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२५-२०२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
६. सन २०२५-२६ च्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२६-२०२७ साला करीता शासकीय लेखा परिक्षण करणेकामी लेखा परिक्षकाची नेमणुक व त्याचे मानधन ठरविणे.
८. मा. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांनी घेतलेल्या कर्जाची नोंद घेणे.
९.सन २०२४-२५ चा दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१०.बाहेरील कर्जे व ठेवी स्विकारणेचे अधिकार संचालक मंडळास देणे.
११. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २४ नुसार सभासद व कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे बाबात
१२. मा. अध्यसाहेब याचे परवानगीचे ऐनवेळी येणारे विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**श्री. वाकचौरे संदिप केरू**
मॅनेजर
जयहिंद नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
(दि. ०१/०८/२०२६)

**टिप :** १) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास त्याच ठिकाणी अर्धा तास थांबुन सभेचे कामकाज त्याच दिवशी पुर्ण केले जाईल. त्यास कोरमची आवश्यकता राहणार नाही.
सुचना : २) संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्याबाबत लेखी सुचना दि. २७/०८/२०२६ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत समक्ष आणुन द्याव्यात.नंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही. ३) ऐनवेळी येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या सुचना स्विकारल्या जाणार नाहीत. ४) संस्थेच्या कामकाजात सभासदांनाच भाग घेता येईल. ५) वरील सभेपुढील विषयांसंबंधी सर्व माहिती संस्थेच्या कार्यालयीन वेळेत सभासदांना समक्ष पहावयास मिळेल.

# सरला बेटाचा प्रमुख तीर्थस्थळ म्हणून विकास करणार - मुख्यमंत्री

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - तीर्थस्थळ म्हणून सरला बेटाच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात येत असून सर्व विकासकामे पूर्ण झाल्यावर सरला बेट महाराष्ट्रातील भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा केंद्र असेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सरला बेट विकासाचा आराखड्याच्या माध्यमातून सभागृह, रस्ते, पूरसंरक्षण आणि सौरऊर्जा यासह विविध कामे सुरू करण्यात आली असल्याची माहितीही त्यांनी दिली.



अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तनानिमित्त आयोजित सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठल लंघे, अमोल खताळ, आशुतोष काळे, विवेल कोल्हे, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे, महंत रामगिरी महाराज, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे आदी उपस्थित होते.

सदगुरू योगीराज गंगागिरी महाराजांनी सुरू केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या परंपरेचा उल्लेख करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सरला बेटावर या ठिकाणाहून समाजाला विचार आणि प्रेरणा मिळते. हरिनाम संकीर्तनामुळे दुःखाचे हरण होते, मनातील 'मी'पणा दूर होतो आणि जातीभेद विसरून सर्वजण एकत्र येतात. प्रत्येकामध्ये विठ्ठलाचे दर्शन घेण्याची भावना निर्माण होते. आजच्या जगामध्ये हरिनाम संकीर्तन समाजाला एकत्र आणणारा आणि जीवनाला सकारात्मक दिशा देणारा मोठा उपाय आहे. भारताची संस्कृती आणि सभ्यता जगातील सर्वात जुनी असून, हजारो वर्षांपासून या भूमीवर सनातन विचार, संस्कार आणि आध्यात्माची परंपरा अखंड सुरू आहे. अनेक आक्रमणे झाली तरी आपल्या विचारांना, संस्कारांना आणि श्रद्धेला कोणीही बदलू शकले नाही. वारकरी परंपरा, गुरु परंपरा आणि हरिनामाच्या शक्तीमुळे ही संस्कृती अखंड राहिली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

हरिनाम संकीर्तनात शेतकरी बांधव सहभागी होत असल्याचा उल्लेख करतांना मुख्यमंत्री म्हणाले, शेतकरी, वारकरी, शेतमजूर आणि समाजातील वंचित घटकांच्या विकासासाठी शासन प्रयत्न करीत आहे. शेतकरी हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने शेतकऱ्यांना दिलेला कर्जमाफीचा शब्द पूर्ण करत साडेबारा लाख शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये आतापर्यंत कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली असून, ५६ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा उपक्रम सुरू आहे. दर पंधरा दिवसांनी नवीन पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करून त्यांच्या खात्यात रक्कम जमा केली जात आहे.

शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, सध्या ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीज मिळत आहे. टप्प्याटप्प्याने १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यात येईल. पुढील काळात वर्षभार १२ तास मोफत वीज देण्याचा निर्धाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, अखंड हरिनाम सप्ताह हा अलौकिक सोहळा असून, या भूमीला योगीराज गंगागिरी महाराजांच्या तपश्चर्येचा आणि आशीर्वादाचा स्पर्श लाभला आहे. महंत रामगिरी महाराजांच्या अमृतवाणीतून भक्तीचा अखंड प्रवाह सुरू आहे. हरिनाम सप्ताह हा केवळ धार्मिक सोहळा नसून समाजाला एकत्र आणणारा, भक्ती आणि संस्कारांची ऊर्जा देणारा सोहळा आहे. गंगागिरी महाराजांनी सुरू केलेली १७९ वर्षांची ही परंपरा आजही मोठ्या श्रद्धेने पुढे सुरू आहे. या सप्ताहामुळे संपूर्ण परिसरात भक्ती, प्रसन्नता आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

शेतकरी आणि महिलांसाठी शासनाच्या विविध योजनांचा उल्लेख करत ते म्हणाले, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुढेही सुरू राहील. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेसोबत राज्य शासनाने नमो शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे. शासनाच्या तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे, अशी शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. कर्जमाफीच्या दुसऱ्या टप्प्यात सहा लाख शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार कोटी रुपये जमा करण्यात आल्याचेही श्री.शिंदे यांनी नमूद केले.

पालकमंत्री डॉ. पाटील म्हणाले, अखंड नामसप्ताह हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून समाजाला एकत्र आणणारा, शांती देणारा आणि जीवनाला योग्य दिशा देणारा आध्यात्मिक सोहळा आहे. सात दिवसांच्या नामस्मरणातून आणि महंत रामगिरी महाराजांच्या मधुर वाणीतून परस्परांमध्ये प्रेम, बंधुभाव वाढविण्याचा तसेच व्यसनमुक्त आणि बलशाली समाज घडविण्याचा संदेश मिळतो.

## संपादकीय...

# नियम आहेत, पण धाक कुठे? रस्त्यांवर बेफाम वाहतूक

रस्त्यावरून प्रवास करताना प्रत्येक नागरिकाच्या मनात एकच अपेक्षा असते-प्रवास सुरक्षित असावा. मात्र, आज शहरांपासून ग्रामीण भागापर्यंत रस्त्यांवर दिसणारे चित्र पाहिले तर ही अपेक्षा दिवसेंदिवस धोक्यात येत असल्याचे जाणवते. वाहतूक नियम आहेत, त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा आहे, दंडाची तरतूद आहे; तरीही नियमभंग थांबण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो-वाहतूक नियम केवळ कागदावरच आहेत का? सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालता दुचाकी चालवणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे, सीटबेल्ट न लावणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी वाहून नेणे, अवैध पार्किंग करणे, भरधाव वेगाने वाहन चालवणे, ओव्हरटेक करताना नियम धाब्यावर बसवणे, अशा प्रकारचे नियमभंग आज सर्रास पाहायला मिळतात. विशेष म्हणजे काही वाहनचालकांना या नियमभंगाची भीतीही वाटत नाही. नियम मोडणे ही जणू आपली सोय आणि नियम पाळणे ही दुसऱ्याची जबाबदारी, अशी मानसिकता रुजत चालली आहे. शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक कोंडी ही रोजचीच बाब झाली आहे. सिग्नल सुरू असतानाही काही वाहनचालक पुढे जाण्याची घाई करतात. सिग्नल लाल झाल्यानंतरही काही वाहने थांबत नाहीत. पादचाऱ्यांसाठी असलेल्या मार्गावर वाहने उभी केली जातात. दुकानांसमोर, रस्त्याच्या कडेला किंवा गर्दीच्या ठिकाणी बेदरकारपणे पार्किंग केले जाते. परिणामी रस्त्याची उपलब्ध जागा कमी होते आणि वाहतूक कोंडीचा प्रश्न अधिक गंभीर बनतो. दुचाकीस्वारांचा नियमभंग तर विशेष चिंतेचा विषय आहे. हेल्मेट वापरणे हे स्वतःच्या सुरक्षेसाठी आवश्यक असतानाही अनेक जण हेल्मेटचा वापर केवळ पोलिसांची नजर चुकवण्यासाठी करतात. काही जण हेल्मेट डोक्यावर ठेवतात, पण पट्टा लावत नाहीत. मोबाईलवर बोलत किंवा संदेश पाठवत वाहन चालवणारे चालकही मोठ्या संख्येने दिसतात. वाहन चालवताना काही सेकंद मोबाईलकडे पाहणेही जीवघेणे ठरू शकते, याची जाणीव असूनही हा प्रकार सुरूच आहे. वेगाने वाहन चालवण्याची स्पर्धा तर आणखी गंभीर आहे. रस्त्यावर काही सेकंद वाचवण्यासाठी वाहनाचा वेग वाढवला जातो; पण त्या काही सेकंदांच्या घाईची किंमत एखाद्याच्या आयुष्याने मोजावी लागू शकते. विशेषतः तरुण वाहनचालकांमध्ये वेगाचे आकर्षण आणि वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष ही चिंतेची बाब आहे. पालकांनीही आपल्या मुलांना वाहन देताना केवळ वाहन चालवण्याचे कौशल्य न पाहता वाहतूक शिस्तीचे शिक्षण देणे गरजेचे आहे.

वाहतूक नियमांची अंमलबजावणी ही केवळ पोलिसांची जबाबदारी आहे, असे मानणेही चुकीचे आहे. प्रशासनाने रस्त्यांची योग्य रचना, स्पष्ट दिशादर्शक फलक, सिग्नल व्यवस्था, पादचारी मार्ग, पार्किंगची सुविधा आणि प्रकाशव्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था, अपुरी पार्किंग व्यवस्था आणि अतिक्रमण यामुळेही वाहतुकीच्या समस्या वाढतात. त्यामुळे नियमभंगावर कारवाईसोबतच वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्याची गरज आहे. यंत्रणेची भूमिका मात्र सर्वात महत्त्वाची आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करताना दुजाभाव होता कामा नये. छोट्या वाहनचालकावर कारवाई आणि मोठ्या वाहनाकडे दुर्लक्ष, अशी भावना नागरिकांच्या मनात निर्माण झाली तर कायद्याचा धाक कमी होतो. दंड वसूल करणे हा वाहतूक व्यवस्थेचा अंतिम उद्देश नसून नियमांचे पालन होणे आणि अपघात कमी होणे हा उद्देश असला पाहिजे. त्यासाठी नियमित तपासणी, सीसीटीव्हीच्या माध्यमातून निरीक्षण, वेगमर्यादेवर नियंत्रण आणि धोकादायक ठिकाणी विशेष पथके तैनात करण्याची गरज आहे. वाहतूक शिस्त ही केवळ पोलिसांच्या उपस्थितीत पाळायची गोष्ट नाही. पोलीस दिसत नसतानाही सिग्नल पाळणे, हेल्मेट वापरणे, सीटबेल्ट लावणे, पादचाऱ्यांना मार्ग देणे आणि निर्धारित वेगमर्यादा पाळणे हीच खरी नागरिकशिस्त आहे. 'मला काही होणार नाही' हा आत्मविश्वास अनेकदा अपघाताचे कारण ठरतो. रस्त्यावर आपल्या एका चुकीमुळे केवळ आपलेच नव्हे, तर दुसऱ्या निष्पाप व्यक्तीचेही आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकते. शाळा आणि महाविद्यालयांपासूनच वाहतूक सुरक्षेबाबत जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. वाहन चालवण्याचा परवाना मिळविणे ही केवळ कायदेशीर प्रक्रिया न राहता जबाबदार चालक होण्याची सुरुवात झाली पाहिजे. सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, पोलीस विभाग आणि स्थानिक प्रशासन यांनी संयुक्तपणे वाहतूक जनजागृती मोहीम राबवली तर त्याचा दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो.आज रस्त्यावरची बेफिकिरी ही केवळ वाहतुकीची समस्या राहिलेली नाही; ती सामाजिक शिस्तीचा आरसा बनली आहे. नियम बनविणे सोपे आहे, त्यांची अंमलबजावणी करणे कठीण आहे आणि त्याहून कठीण आहे ती नागरिकांची मानसिकता बदलणे. मात्र, अपघात झाल्यानंतर हळहळ व्यक्त करण्यापेक्षा अपघात होऊ नयेत यासाठी आधीच कठोर पावले उचलणे अधिक महत्त्वाचे आहे.

# अमृतवाहिनी मॉडेल स्कूलच्या संबोधी आहेरचे राष्ट्रीय स्तरावर यश



युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर - दि. १५ ऑगस्ट रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आलेल्या सप्तरंग कल्चरल फेस्टिव्हलच्या नॅशनल लेव्हल कॉम्पिटिशनमध्ये अमृतवहिनी मॉडेल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, अमृतनगर येथील विद्यार्थिनी कु. संबोधी आहेर हिने आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करत दोन पारितोषिके पटकावून राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले.

संबोधी आहेर हिने सेमी-क्लासिकल मॉडेल डान्स या प्रकारात आपल्या अप्रतिम नृत्याविष्काराने परीक्षकांची मने जिंकत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. तसेच सोलो सिंगिंग - लोकगीत या प्रकारातही तिने आपल्या सुरेल व दमदार गायनाने परीक्षकांची दाद मिळवत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त केले.

नृत्य आणि गायन या दोन्ही कला प्रकारांत राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करून तिने शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या दुहेरी यशाबद्दल अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री मा. नामदार बाळासाहेब थोरात, संस्थेचे विश्वस्त आ. डॉ. सुधीर तांबे, माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे, व्यवस्थापकीय विश्वस्त सौ. शरयू देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे व्यवस्थापक प्राचार्य व्ही. बी. धुमाळ डायरेक्टर अकॅडेमिक्स डॉ. जे..बी. गुरव तसेच प्राचार्य आशिष कुमार यांनी संबोधी आहेर हिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# खूनातील मुख्य सुत्रधार शोधा, ग्रामस्थांचे उपोषण

युवावार्ता (प्रतिनिधी)
अकोले - तालुक्यातील धामोडी फाटा येथे २६ जुलै २०२६ रोजी सचिन किसन वाकचौरे (वय ३६) यांची अतिशय निघृणपणे हत्या करण्यात आली. या खुनाचे मुख्य सूत्रधार शोधून त्यांना तात्काळ अटक करावी आणि परिसरातील अवैध धंदे पूर्णपणे बंद करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी पिंपळगाव निपाणी येथील ग्रामस्थांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

सचिन वाकचौरे खून प्रकरणातील पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांचा मृतदेह हातपाय बांधलेल्या आणि नग्न अवस्थेत पिंपळगाव खांड धरणात फेकून देण्यात आला होता. या हत्याकांडातील चार आरोपींना पोलिसांनी अटक केली असली, तरी त्यांच्यामागील मुख्य सूत्रधारांचा शोध घेऊन त्यांना सहआरोपी करावे, तसेच गंभीर गुन्हे दाखल असलेल्या सर्व आरोपींवर मकोका कायद्याअंतर्गत कारवाई करावी, या मागणीसाठी पिंपळगाव निपाणी ग्रामस्थ उपोषणाला बसले आहेत. उपोषणास बसलेले डी. के. बोर्डे आणि अन्य ग्रामस्थांनी यावेळी विविध मागण्या केल्या आहेत.






# आजच्या विज्ञानातून विज्ञानदृष्टी आत्मसात करा : डॉ. निवास पाटील

युवावार्ता (प्रतिनिधी)
संगमनेर -: विज्ञानाचे वाचन, अध्ययन आणि प्रयोगशीलतेमुळे विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल व जिज्ञासा निर्माण होते. महान वैज्ञानिकांच्या जीवनकार्याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी. अंधश्रद्धेपेक्षा तर्क, निरीक्षण आणि प्रयोगांना महत्त्व देत प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करावा. मिळविलेले ज्ञान केवळ वैयक्तिक प्रगतीसाठी न वापरता समाजाच्या उन्नतीसाठी उपयोगात आणावे असे प्रतिपादन डॉ. निवास पाटील यांनी केले.

श्री संत ज्ञानेश्वर माऊली विद्यालय, नान्नज दुमाला येथे 'आजचे विज्ञान' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या विविध शाखांची माहिती देत आधुनिक जगाच्या विकासामध्ये विज्ञानाचे असलेले महत्त्व स्पष्ट केले.

डॉ. पाटील यांनी महान शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाची माहिती देताना प्रतिकूल परिस्थितीतही जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर मोठे यश मिळविता येते, असा संदेश दिला. तसेच अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या संशोधनाची माहिती देत त्यांच्या वैज्ञानिक विचारांचा मानवी जीवनावर झालेला परिणाम स्पष्ट केला.



विश्वाची निर्मिती, आकाशगंगा, ग्रह-तारे, गुरुत्वाकर्षण, स्फोट सिद्धांत, उल्का, उल्कापाषाण, लोणार सरोवर, अंतराळयान आणि परग्रहावर जीवसृष्टी असण्याची शक्यता अशा विविध विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्लाईड शोच्या माध्यमातून खगोलविश्वाची चित्रमय माहिती देत विद्यार्थ्यांना जणू अवकाशाची सफर घडवून आणली. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान आणि अंतराळाविषयी मोठी उत्सुकता निर्माण झाली. व्याख्यानानंतर झालेल्या प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांनी विश्वनिर्मिती, अंतराळ, ग्रह-तारे आणि विज्ञानाशी संबंधित विविध प्रश्न विचारले. डॉ. पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना अभ्यासपूर्ण उत्तरे देत त्यांची जिज्ञासा वाढवली. अंधश्रद्धा ही समाजाच्या प्रगतीसाठी घातक असून दैनंदिन जीवनातही वैज्ञानिक विचारसरणीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यावेळी डॉ. निवास पाटील यांनी विद्यालयास वैज्ञानिक व प्रेरणादायी पुस्तकांचा संच भेट दिला. या पुस्तकांमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञानविषयक ज्ञानात भर पडण्यासोबतच वाचनाची आवड निर्माण होईल, असा विश्वास सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज संस्थेचे संचालक व स्थानिक स्कूल कमिटीचे अध्यक्ष बाबासाहेब कडनर यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास भारतरत्न राजीव गांधी विद्यालय, निमजचे माजी मुख्याध्यापक शांताराम डोंगरे, बाबासाहेब कडनर, विद्यालयाचे मुख्याध्यापक एच. आर. सोनवणे, शिक्षक प्रतिनिधी विलास गायकवाड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक विज्ञान शिक्षक एस. एम. वाकचौरे यांनी केले. सूत्रसंचालन बी. आर. पिंगळे व वसंत बोडखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गणित शिक्षिका मनिषा शेळके यांनी केले.

# रविंद्र घोसाळे यांना राज्यस्तरीय 'धम्मरत्न' पुरस्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)
नाशिक - आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. रविंद्र विठ्ठल घोसाळे यांना सामाजिक व धम्मकार्याची दखल घेत नाशिक येथे मानाचा 'राज्यस्तरीय धम्मरत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दान पारमिता फाऊंडेशन आणि लोककवी डॉ. वामनदादा कर्डक प्रतिष्ठान, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. २० ऑगस्ट) लक्ष्मीनारायण भवन, चेतना नगर, नाशिक येथे पहिले विश्व धम्मालिपी, लेणी, पालि भाषा साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. धम्मालिपी संशोधक जेम्स प्रिन्सेप यांच्या २२७व्या जयंतीनिमित्त 'धम्मालिपी दिन' तसेच लोककवी डॉ. वामनदादा कर्डक यांच्या १०४व्या जयंतीचे औचित्य साधून हा कार्यक्रम झाला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत लेणी संवर्धन, धम्मालिपी, पालि भाषा, बौद्ध धम्म व संस्कृतीच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या ३० हून अधिक उपासक-उपासिकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. मध्य प्रदेशातील सुप्रसिद्ध बौद्ध साहित्यिक व विचारवंत मोतीलाल आलमचंद्र आणि ज्येष्ठ बौद्ध साहित्यिक अतुल भोसेकर यांच्या हस्ते डॉ. घोसाळे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. संमेलनाचे उद्घाचन अभिनेत्री गार्गी फुले यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थान मोतीलाल आलमचंद्र यांनी भूषविले. अतुल भोसेकर यांनी बौद्ध संस्कृतीचा प्रचार-प्रसार ही काळाची गरज असून, भारताच्या सर्वांगीण प्रगतीत बौद्ध धम्माचे मोठे योगदान असल्याचे सांगितले. दुसऱ्या सत्रात विजय मोहिते व आशा उके यांनी पालि भाषेचे आधुनिक काळातील महत्त्व, प्राचीन बौद्ध वारसा आणि एआय युगातील ज्ञानाचा आधुनिक डिजिटल सेतू या विषयांवर मार्गदर्शन केले. अभिनेता व गायक नंदेश उमप, दैनिक सम्राटचे कार्यकारी संपादक कुणाल कांबळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो - हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

SR THORAT — JOB — GAGANGIRI PACKAGED PURITY

| Sr. No. | Post | QTY | Qualification and Experience |
|---|---|---|---|
| 1 | Security Guard | 5 | Experience Minimum 5 Year (Ex-Servicemen preferred) |
| 2 | Fitter/Welder/ Mechanical/ Electrical/ Refrigeration | 5 | ITI,DME or any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 3 | Data Operator/ Supervisor | 5 | Any Graduate, Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |
| 4 | Chemist | 5 | B.Sc. Experience Minimum 3 Year, Age below 30 Year |

Office Address-S.R.Thorat Milk Products Pvt.Ltd, Rajapur Road,Sangamner, Dist- Ahilyanagar
Mobile Number – 9860100936/937
Sent the CV Following E-Mail Id:
admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com




**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

**पाहिजेत**
सुंदरम गोल्ड आणि प्लास्टिक, संगमनेर
ऑफसेट मशिन ऑपरेटर १ जागा
स्क्रिन प्रिटींग – २ जागा
टेलीकॉलर – २ (महिला)
– संपर्क –
९८२२४५३०३६

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा (वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

# विठोबा गणपत आभाळे गुरुजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## "माझे बाबा - आठवणींच्या आभाळात सदैव जिवंत"



माझे बाबा विठोबा गणपत आभाळे गुरुजी... वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांनी या जगाचा निरोप घेतला. आयुष्याची ९६ वर्षे त्यांनी केवळ जगली नाहीत तर ती समृद्ध केली. शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत पेटवली, सामाजिक कार्यकर्ते म्हणून अनेकांच्या प्रश्नांसाठी उभे राहिले, साहित्यिक म्हणून आपल्या भावना शब्दबद्ध केल्या आणि बाबा म्हणून आमच्या आयुष्याला प्रेम, शिस्त आणि संस्कारांची श्रीमंती दिली. आज ते आमच्यात प्रत्यक्ष नाहीत, ही जाणीव मनाला चटका लावणारी आहे. पण त्यांच्या आठवणींचे आभाळ खूप विशाल आहे.

बाबांचे संपूर्ण आयुष्य शिक्षण आणि समाजसेवेला समर्पित होते. तालुकामास्तर म्हणून त्यांनी अनेक वर्षे ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले. सन १९९० मध्ये ते निवृत्त झाले. शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर शिस्त, प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकीचे संस्कार दिले. निवृत्तीनंतरही बाबांनी स्वतःला कधीच समाजापासून दूर केले नाही. धरण पुनर्वसन समितीचे सदस्य, पेन्शनर संघटनेचे पदाधिकारी तसेच ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सामाजिक कार्य सुरू ठेवले. निळवंडे धरण आणि धरणग्रस्तांच्या प्रश्नांशी त्यांचा अतिशय जवळचा संबंध होता. धरणग्रस्तांच्या हक्कांसाठी आणि पुनर्वसनासाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या सामाजिक जाणीवेची आणि कर्तव्यनिष्ठेची साक्ष देत राहील. बाबा केवळ शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते नव्हते; ते संवेदनशील साहित्यिकही होते. त्यांच्या लेखणीतून 'आभाळ गाण' हा कवितासंग्रह आणि 'कथा निळवंडे धरणाची' हे पुस्तक प्रकाशित झाले. त्यांनी पाहिलेला समाज, अनुभवलेले जीवन, निळवंडे धरणाशी जोडलेली माणसं आणि धरणग्रस्तांचे प्रश्न त्यांच्या साहित्यामधून शब्दबद्ध झाले. त्यामुळे त्यांचे साहित्य म्हणजे त्यांच्या आयुष्याचा आणि विचारांचा एक जिवंत दस्तऐवज आहे.

शब्दांत त्यांनी जपली माती, शब्दांत जपला गाव,लेखणीतून उमटत राहिला संघर्षाचा ठाव; 'आभाळ गाण' गात राहील त्यांच्या स्मृतींची शान,'कथा निळवंडे धरणाची' देत राहील त्यांची ओळख महान. बाबांचा स्वभाव शिस्तप्रिय, प्रेमळ, स्पष्टवक्ते आणि मनमोकळा होता. शिस्तीबाबत ते काटेकोर होते; पण त्यांच्या शिस्तीच्या मागे प्रेम असायचे. माझ्या आयुष्यातील एक आठवण तर माझ्या मनावर कायमची कोरली गेली आहे. मी चौथीत असताना शिष्यवृत्ती परीक्षेत माझा नंबर आला. माझ्या यशाची बातमी ऐकून बाबांना झालेला आनंद आजही डोळ्यांसमोर उभा राहतो. त्या आनंदात मी त्यांना मारलेली मिठी आजही माझ्या मनात ताजी आहे. त्यांच्या चेहऱ्यावरचा तो अभिमान आणि डोळ्यांतील आनंद शब्दांत मावणारा नव्हता.

त्यानंतरही माझ्या प्रत्येक यशात बाबांना मोठा आनंद होता. बाबांना घरच्या माणसांच्या हातच्या साध्या-साध्या पदार्थांचीही खूप आवड होती. आईच्या हातच तव्यावरच पिठलं आणि अज्जीच्या हातचा शिरा त्यांना विशेष आवडायचा. त्या दोघींनीही बाबांना कितीही उशीर झाला तरी त्यांना कधीही कंटाळा न करता गरम गरम जेवण बनवले. त्यामुळे ते आईला कधी कधी अन्नपूर्णा म्हणायचे. त्यांच्या जेवणाच्या बाबतीत फारशा आवडी निवडी नसायच्या. अन्न हे पूर्णब्रह्म या उक्तीप्रमाणे ते जे असेल ते आवडीने खायचे. अगदी त्यांच्या नातसूना निशा वहिनी आणि अंकिता यांच्या हातचे नवनवीन पदार्थ देखील ते अत्यंत चवीने आणि कौतुक करून खायचे. अकोल्याला कामानिमित्त ते दर सोमवार आणि गुरुवार असायचे संघटनेचे काम झाले की गुरुवारच्या बाजारातून येताना खाऊ घेऊनच यायचे त्यांची आम्ही खूप आतुरतेने वाट पाहत असायचो .

एखादी गोष्ट त्यांच्या मनासारखी झाली की त्यांचा नेहमीचा एक शब्द असायचा बेस्ट झालं!

त्या दोन शब्दांत किती प्रेम आणि कौतुक असायचे, हे ज्यांनी अनुभवले आहे त्यांनाच कळेल. एकदा मी शेवग्याच्या शेंगांची भाजी केली होती. बाबा भाजी खाताना म्हणाले शेंगा बेस्ट झाल्या एव्हढ बोलून थांबले नाही तर शेंगा कापताना मी त्या अगदी नीट, सारख्या आणि बारकाईने कापल्या होत्या याच वर्णन केले. आज विचार केला तर ती फक्त शेंगांची केलेली प्रशंसा नव्हती. माझ्या प्रयत्नाची त्यांनी घेतलेली दखल होती. छोट्या गोष्टीतही आनंद शोधण्याची आणि समोरच्याच्या प्रयत्नाचे मनापासून कौतुक करण्याची बाबांची ती खासियत होती. राजूरचा पेढा त्यांना खूप आवडायचा आणि राजूरला गेले की आमच्यासाठी ही पेढे घेऊन यायचे आणि प्रत्येकाला स्वतःच्या हाताने वाटायचे. त्यांना खूप गोड आवडायचे आणि त्यांना शेवटपर्यंत कधीच शुगरचा त्रास झाला नाही अगदी शेवटच्या दिवशीही त्यांनी गुळाची खीर खाल्ली याबद्दल खरच देवाचे खुप आभार. बाबांच्या आयुष्यातील सर्वांत हळवा आणि जिव्हाळ्याचा पैलू म्हणजे बाईची-आमच्या आजीची-त्यांनी घेतलेली काळजी.

बाईच्या औषधांवर, गोळ्यांवर आणि तिच्या तब्येतीवर त्यांचे खूप लक्ष असायचे. स्वतःच्या आरोग्याची फारशी चिंता न करणारे बाबा मात्र बाईच्या औषधांच्या बाबतीत अत्यंत जागरूक असायचे. बाईंना नीट ऐकू येत नव्हते. पण दोघांनाही वाचता-लिहिता येत असल्यामुळे त्यांचा संवाद एका सुंदर आणि आगळ्या पद्धतीने चालायचा. बाबा पाटीवर लिहायचे, बाई ते वाचायची आणि त्यावर उत्तर द्यायची. कधी औषधांची आठवण, कधी घरातील एखादी गोष्ट, कधी साधी चौकशी-पाटीवर उमटणारे ते शब्द म्हणजे त्यांच्या सहजीवनातील प्रेमाचा संवाद होता.

आवाज हरपला तरी संवाद त्यांचा थांबला नाही,
पाटीवरच्या शब्दांत प्रेम कधी कमी झाले नाही;
आयुष्यभर जपली त्यांनी एकमेकांची साथ, त्या नात्याची आठवण राहील मनात दिवसरात्र. प्रेमाला नेहमी आवाजाची गरज नसते, हे बाबांनी आणि बाईंनी त्यांच्या नात्यातून आम्हाला शिकवले.

नातवंडे हा बाबांच्या आयुष्यातील आनंदाचा ठेवा होता. त्यांच्या प्रत्येक यशाचा त्यांना विशेष अभिमान वाटायचा. त्यांच्या शिक्षणाची, प्रगतीची आणि कर्तृत्वाची ते मनापासून चर्चा करायचे. एकुलत्या एका नातीबद्दल त्यांना विशेष प्रेम आणि कौतुक होते. माझ्याबद्दल बाबांना एका गोष्टीचा विशेष अभिमान होता मी त्यांची शिक्षकी पेशाची गादी पुढे चालवली. त्यांनी आयुष्यभर ज्या पेशाला आपले जीवन समर्पित केले, त्याच क्षेत्रात मी काम करत आहे ही गोष्ट त्यांना मनापासून आनंद देणारी होती. मी कधी भेटायला गेले तरी सुट्टी आहे का असं आधी विचारायचे जास्त रजा काढू नको विद्यार्थ्यांचं नुकसान होत असं दटावून सांगायचे आणि तुझं काम प्रामाणिकपणे कर विद्यार्थी हेच आपलं खरं धन अशी शिकवनही द्यायचे त्यांची हीच शिक्षणाविषयीची निष्ठा आणि विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम पुढे नेण्याचा प्रयत्न करत आहे. आमच्या घरातील शैक्षणिक वाटचाल बाबा आणि काका यांच्या नंतर मी चालू ठेवली याचा मला खूप आनंद होतो.त्यांच्या प्रामाणिकपणामुळेच मला संगमनेरच्या शारदा शिक्षण संस्थेसारख्या एका नावाजलेल्या संस्थेत पवित्र पोर्टल मार्फत काम करण्याची संधी मिळतेय. ते नेहमी म्हणायचे शिफारस करून कुठेही नोकरी करायची नाही जे करायचे ते स्वतः च्या हिमतीवर. त्याचे अनुकरण करूनच आमच्या घरातील प्रत्येक जण आपापल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी मारतो आहे. आम्हा प्रत्येक नातवंडामध्ये त्यांचे गुण उतरले आहे. माझा मोठा दादा अक्षय याच्यामध्ये त्यांच्यासारखी सामाजिक जाणीव, समाजसेवा, समजदारपणा, माझ्यामध्ये त्यांचा असणारा शिक्षकी गुण त्यांचा आवाज, शिस्तबद्ध काम, प्रशांतमध्ये त्यांची चित्रकला, गणपती बनविणे, सुंदर अक्षर, सुमित मध्ये त्यांची कामाप्रती असणारी निष्ठा,जबाबदारीची जाणीव, विवेक मध्ये त्यांची हुशारी, प्रामाणिक पणा आणि वेदांतमध्ये चित्रकला, शिल्पकला या गोष्टी आपोआप आल्या आहेत. आम्हा सर्वांचा त्यांना खूप अभिमान असायचा. आमचे पप्पा, काका, अण्णा, हौसा आत्या, मंदा आत्या, सगळ्या सुना, नातवंडे, नातसूना यांनी त्यांची मध्ये दोन वर्षापूर्वी आजारी असताना मनापासून सेवा केली आणि त्यामुळेच दोन महिन्यात ते परत पूर्वीसारखे ठणठणीत बरे झाले. त्यांनी कधीही आजारपणाला घाबरून आयुष्याकडे पाहिले नाही. वयाच्या ९६ व्या वर्षीही बाबा उत्साही होते. नवीन गोष्टी जाणून घेण्याची त्यांची उत्सुकता शेवटपर्यंत कायम होती. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगातही ते मागे राहिले नाहीत. युट्यूब आणि व्हॅटसॲप वापरणारे बाबा खऱ्या अर्थाने अपडेटेड होते. वय वाढले, पण त्यांचे मन कधीच म्हातारे झाले नाही.

बाबांनी कुटुंबाला जोडून ठेवले. अजूनही आमची दिवाळी निळवंडे या आमच्या मूळ गावी एकत्र साजरी होते. बाबा, तुम्ही शिक्षक होता, तुम्ही सामाजिक कार्यकर्ते होता, तुम्ही साहित्यिक होता, पण आमच्यासाठी तुम्ही यापेक्षा कितीतरी मोठे होता. तुम्ही आमचे बाबा होता. तुमच्या जाण्याने आमच्या आयुष्यात कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. पण तुमच्या आठवणी आम्हाला केवळ रडवत नाहीत; त्या आम्हाला जगण्याची ताकद देतात.

तुमचे आयुष्य आमच्यासाठी एक पुस्तक होते- शिस्तीचे, प्रेमाचे, संघर्षाचे, साहित्याचे आणि माणुसकीचे. ते पुस्तक आता बंद झाले असेल,पण त्यातील प्रत्येक पान आमच्या मनात कायम उघडे राहील. तुम्ही आमच्यात प्रत्यक्ष नाही,

पण आमच्या संस्कारांत आहात...

आमच्या कर्तृत्वात आहात...

तुमचे नाव, तुमचे विचार आणि तुमचे संस्कार पुढे नेणे-हीच तुमच्यासाठी आमची खरी आदरांजली. आभाळ झाले बाबा, तरी सावली तुमची आहे, आठवणींच्या प्रत्येक क्षणी चाहूल तुमची आहे; डोळ्यांत अश्रू असले तरी मनात अभिमान आहे, कारण आमच्या आयुष्यात 'बाबा' म्हणून तुमचे स्थान महान आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली, बाबा... तुमची नात

**सौ. अनुजा आभाळे-सहाणे, संगमनेर**

## निळवंडेच्या आठवणींत सदैव जिवंत राहतील 'दादा'

काही माणसांची ओळख सुरुवातीला अगदी साधी असते; पण सहवास वाढत जातो तसे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एकेक पदर उलगडत जातात. विठोबा गणपत आभाळे गुरुजी हे असेच एक बहुआयामी, ऋजू, मनस्वी आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व होते. विनायक आभाळे हा आमचा मित्र आणि त्याचे वडील एवढाच सुरुवातीचा परिचय. मात्र 'काव्यधारा' या सामूहिक काव्यसंग्रहाच्या निमित्ताने आमच्या भेटीगाठी वाढल्या. त्यातून आभाळे गुरुजी-आमचे लाडके 'दादा'-यांच्याशी असलेला परिचय हळूहळू अतूट स्नेहबंधात रूपांतरित झाला. प्रा. विनायक आभाळे, प्रा. अनिल कवठेकर, प्रा. मधुकर मोरे, प्रा. पंढरीनाथ पाटील, कैलास बच्छाव आणि मी अशा मित्रमंडळींच्या भेटी कधी कल्याणात, तर कधी निळवंड्याला रंगत असत.

प्रत्येक भेटीत दादांच्या व्यक्तिमत्त्वाचा नवा पैलू समोर येत गेला. ४३ वर्षे प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा बजावताना त्यांनी कविता, लेखन, चित्रकला, गायन, वादन, कथाकथन, अभिनय आणि मूर्तिकला अशा विविध कलांमध्येही स्वतःला रमवले. विद्यार्थ्यांमध्ये कलांची आणि समाजप्रबोधनाची गोडी निर्माण करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. दादांच्या सहवासातील साहित्यिक मैफली विशेष स्मरणात राहतील. रात्री जेवण आटोपल्यानंतर टेरेसवर आमच्यासाठी बिछायती टाकल्या जात. एखादी कविता आठवली की ऐंशीच्या घरातील दादा तरुणाच्या उत्साहाने खाली उतरून ती शोधत आणि पुन्हा वर येत. एकीकडे निळवंडे धरणाच्या पाण्याचा घनगंभीर नाद आणि दुसरीकडे दादांच्या कवितांची गाज-ही अनोखी मैफल आमच्या मनात कायमची कोरली गेली.

निळवंडे धरणाचे काम अंतिम टप्प्यात असताना आम्ही दादांसोबत धरण परिसरात फिरलो. त्यांनी धरणाचा इतिहास जणू डोळ्यांसमोर उभा केला. धरणाची जागा कशी निश्चित झाली, विविध बैठका, आंदोलने आणि संघर्ष कसे झाले, याचा सारा इतिहास त्यांच्या स्मरणात ताजा होता. ऐंशीच्या घरात असूनही ते आमच्यापेक्षा उत्साहाने पुढे चालत होते. त्यांची स्मरणशक्ती आणि वाणीचा ओघ विलक्षण होता. 'कथा निळवंडे धरणाची' हे पुस्तक विनायकने शब्दांकित केले असले, तरी त्यामागचा अनुभव आणि इतिहास दादांचाच होता. स्वतः प्रकल्पग्रस्त असल्याने त्यांनी निळवंडे धरणाचा संघर्ष जवळून अनुभवला. विविध आंदोलने, चळवळी, परिषदा आणि चर्चांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यामुळे हे पुस्तक केवळ धरणाची कथा नसून एका प्रकल्पग्रस्ताच्या संघर्षाची आणि अनुभवांची गाथा आहे. दादांचा दांडगा लोकसंग्रह ही त्यांच्या आयुष्याची खरी कमाई होती. समोरच्या माणसाच्या वेळेचा आणि परिस्थितीचा विचार करणारा त्यांचा संवेदनशील स्वभाव सदैव स्मरणात राहील. आज दादा आपल्यात नाहीत; मात्र त्यांचा शब्द, कविता, कार्य, माणुसकी आणि आठवणी निळवंडेच्या पाण्यासारख्याच अखंड वाहत राहतील. धरणाच्या पाण्याचा नाद ऐकला की त्यांचा खणखणीत आवाज आठवेल आणि साहित्याची मैफल रंगली की दादांची आठवण मनात पुन्हा जागी होईल. बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे धनी, संवेदनशील कवीमनाचे सुहृद, समर्पित शिक्षक आणि आमचे जिव्हाळ्याचे 'दादा'-विठोबा गणपत आभाळे यांच्या पुण्यस्मृतीस विनम्र अभिवादन!

**बाळकृष्ण शिंदे**
**कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूल, कल्याण**

# उत्तमराव भिमाजी देशमुख यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## कर्तृत्व, संस्कार आणि माणुसकीचा अखंड दीपस्तंभ हरपला



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

जीवनाच्या प्रवासात अशा काही पाऊलवाटा येतात की आपली अमूल्य संपत्ती असणारे, आपल्यावर मायेची पाखरण करणारे आपल्यावरील आशीर्वादाचे हात अचानक आपल्यातून नाहीसे होतात. ज्यांच्या आपल्यासोबत असण्याने आपण निश्चिंत असतो. कोणत्याही संकटाचा सामना करण्याची ताकद आपल्यात असते. त्यांनाच आपण गमावून बसतो. माझे सासरे श्रद्धेय नाना तथा कै. उत्तमराव भिमाजी देशमुख यांना मंगळवार दिनांक १८ ऑगस्ट २०२६ रोजी देवाज्ञा झाली. ते आमच्यातून जाऊन आज आठ दिवस झालेत. त्यांचा हवाहवासा सहवास, त्यांचे पुन्हा पुन्हा ऐकावेसे वाटणारे शब्द, त्यांचा डोक्यावरून फिरणारा प्रेमळ व थरथरणारा हात अचानक नाहीसा झाला. त्यांचे असणे माझ्यासाठी व माझ्या कुटुंबासाठी सगळं काही होतं, आज त्यांच्या नसण्याने आमच्या कुटुंबात, जीवनात निर्माण झालेली पोकळी कधीच भरून येणार नाही. त्यांच्या जाण्याने कुटुंबाचा आधारवड कोसळला आहे. त्यांचा जन्म दिनांक ९ सप्टेंबर १९३८ रोजी अकोले तालुक्यातील उंचखडक बु. या छोट्याशा गावी झाला. अत्यंत गरीब कुटुंबात व हलाखीच्या परिस्थितीतही त्यांनी मॉडर्न हायस्कूल मधून ११ वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून कृषी सहाय्यकाचा कोर्स पूर्ण केला व १९६३ मध्ये ते कृषी सहाय्यक म्हणून कोपरगाव येथे महाराष्ट्र शासनाच्या सेवेत रुजू झाले. १९६३ ते १९७५ या कालावधीत त्यांनी कोपरगाव व नेवासा या दोन तालुक्यांमध्ये कृषी सहाय्यक म्हणून आपले सेवाकर्तव्य बजावले. १९७६ ते १९८६ या कालावधीत त्यांनी ग्रामसेवक म्हणून सावळीविहिर, देवठाण व समशेरपूर येथील ग्रामपंचायतींमध्ये आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. १९८६ ते १९८८ या कालावधीत कोपरगाव येथे विस्तार अधिकारी कृषि म्हणून सेवा दिली. १९८९ ते १९९६ या कालावधीत ते अकोले पंचायत समितीत तालुका पंचायत अधिकारी (TPO) म्हणून कार्यरत होते. सप्टेंबर १९९६ मध्ये ते तालुका पंचायत अधिकारी (TPO) या पदावर सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीनंतरचा त्यांचा कालावधी आपल्या कुटुंबासमवेत त्यांनी अत्यंत आनंदाने घालवला. आपल्या चारही मुलांना राजीव, संदिप, महेश, श्रीदत्ता यांना त्यांनी उत्तम शिक्षण व संस्कार देऊन चांगला माणूस म्हणून घडवले. सून म्हणून मला त्यांचा नेहमीच अभिमान वाटला व वाटतो. त्यांनी रोवलेली शिक्षणाची मुहूर्तमेढ, त्यांनी दिलेली संस्कारांची देण, त्यांनी जपलेली नाती यावर आमच्या कुटुंबाचा डोलारा ठामपणे उभा आहे. २७ मे १९९४ या दिवशी मी सून म्हणून या कुटुंबात आले व सासर माहेर हेच झाले. माझे सासरे ज्यांना आम्ही नाना म्हणतो, माझ्यावर प्रचंड प्रेम व माया केली. आपण या घरची सून आहोत असे मला कधीच वाटले नाही. केवळ मीच नाही तर आपल्या चारही सुनांवर सविता, ज्योती, पल्लवी त्यांनी अगदी मुलीप्रमाणे प्रेम केले. १९९७ मधील तो दिवस व प्रसंग मी कधीच विसरू शकणार नाही. त्यावेळी मी अभिनव शिक्षण संस्थेत शिक्षिका म्हणून कार्यरत होते. सायंकाळची वेळ होती. माझं घरातलं काम आटोपून मी सहजच बाहेर आले,बघते तर काय! नवी कोरी टू व्हीलर, टोरो जाज दारासमोर उभी होती. नानांनी घरात कुणालाही न सांगता, कुठलीही चर्चा न करता माझ्यासाठी डायरेक्ट टू व्हीलर गाडी दारात आणून उभी केली होती. हे माझ्यासाठी खूप मोठे सरप्राईज होते. दुसऱ्याच दिवसापासून मी शाळेत गाडीवर जायला सुरुवात केली. त्यावेळी अकोल्यात टू व्हीलर चालवणारी मी पहिली महिला होते. सून असूनही ते मला माई अशी हाक मारायचे. काय ग माई अजून शाळेतच आहेस का? , माई जेवली का? त्यांचे हे शब्द मला आता कधीच ऐकायला येणार नाहीत पण ते कायम स्वरूपी माझ्या मनावर कोरले गेलेत. माझे वडील मला 'ताई सरकार' अशी हाक मारायचे तर माझे सासरे म्हणजे नाना मला 'माई' अशी हाक मारायचे. या दोनही व्यक्तींना मी माझ्या आयुष्यातून गमावून बसले. माझ्या आयुष्यातील ही पोकळी कधीच भरून निघणार नाही. माझे शिक्षण, माझे पद, माझे शैक्षणिक काम याबद्दल त्यांना नेहमीच खूप अभिमान वाटायचा. माझे पती श्री. राजीव देशमुख यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमात त्यांचे व माझ्या सासूबाई यांचे आमच्या सोबत असणे व त्यांना आपल्या मुलाचा वाटत असलेला अभिमान ही माझ्यासाठी खूप मोठी गोष्ट होती. त्यांनी स्वतःच्याच उदाहरणातून कुटुंबातील प्रत्येकाला शिकण्याची प्रेरणा दिली जी माझ्या कुटुंबाची न संपणारी उर्जा आहे. आज माझ्या मुलांसमोर त्यांचे 'बाबा' म्हणजे एक रोल मॉडेल आहेत. माझी मुले आशिष, लौकिक तसेच सुजान, निकिता, लौकिक, समीक्षा, सेजल, वेदांत, जान्हवी ही सर्वच नातवंडे यांच्यावर त्यांनी केलेले संस्कार, प्रेम, माया ही कुटुंबाला मिळालेली खूप मोठी संपत्ती आहे. नातवंडे शिक्षणासाठी बाहेर जायला निघाली व बाबांचे आशीर्वाद घेण्यासाठी त्यांच्याजवळ गेली की त्यांचा खिशात हात गेलाच! प्रत्येकाच्या हातावर हजार दोन हजार रुपये दिले की त्यांना बरे वाटायचे. एखाद्यावेळी त्यांच्याजवळ पैसे नसले की मुलांना पैसे ऑनलाईन ट्रान्सफर करण्यासाठी हट्ट करायचे. जोपर्यंत मुलांना पैसे मिळत नाहीत तोपर्यंत त्यांच्या जीवाला चैन पडत नसे. केवळ इतकेच नाही तर गावातील त्यांचे पुतणे, पुतण्या, भाचे, नात्यातील वा ओळखीची मुले, मुली त्यांना कुठेही भेटली तर प्रत्येकाची आस्थेने चौकशी करून त्यांना ५०, १०० रुपये दिल्याशिवाय ते पुढे जात नसे. स्वतःची मुले, सुना, नातवंडे यांच्यावरच नाही तर त्यांच्या सहवासातील सर्वांवर त्यांनी भरभरून प्रेम केले. दर दोन-तीन दिवसांनी ते सर्व नातवंडांना, मुलींना, पुतण्यांना व त्यांच्या सहवासातील अनेकांना फोन करणार, प्रेमाने विचारपूस करणार, चौकशी करणार. त्यांच्या प्रेमळ, मितभाषी व आपुलकीच्या स्वभावामुळे ज्या गावांमध्ये त्यांनी सेवा केली तेथील गावकरी, ग्रामपंचायतीतील सदस्य, अधिकारी, कर्मचारी या सर्वांशी त्यांचे प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध तयार झाले. प्रत्येक गावामध्ये त्यांचा खूप मोठा मित्रपरिवार तयार झाला. अनेक शेतकऱ्यांशी व सामान्य जनतेशी त्यांची नाळ जोडलेली होती. अगदी अधिकाऱ्यापासून तर सामान्य कर्मचाऱ्यापर्यंत प्रत्येकाला ते तितक्याच आदराने वागवायचे.

साधी राहणी, उच्च विचार आणि कर्तव्यनिष्ठ जीवन ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती. शासनाच्या विविध पदांवर कार्य करताना त्यांनी प्रामाणिकपणा आणि सचोटीची कास कधीही सोडली नाही. ग्रामविकास अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी आणि तालुका पंचायत अधिकारी म्हणून त्यांनी केलेली सेवा ही जनतेसाठी समर्पित जीवनयात्राच होती. त्यांच्या शब्दांत अनुभवाची शिदोरी होती, तर त्यांच्या कृतीत जीवनमूल्यांचा खजिना दडलेला होता. प्रत्येक वेळी त्यांनी आम्हाला कष्ट, प्रामाणिकपणा आणि माणुसकीची शिकवण दिली. त्यांच्या सहवासात असताना जीवनातील प्रत्येक आव्हान पेलण्याचे बळ मिळत असे. त्यांचे व्यक्तिमत्त्व वटवृक्षासारखे होते, स्वतः उन्हात उभे राहून इतरांना सावली देणारे. त्यांच्या चेहऱ्यावरचे समाधान, बोलण्यातला संयम आणि वागण्यातला मोठेपणा हे प्रत्येकाला आपलेसे वाटायचे. कुटुंबातील प्रत्येकाच्या यशात त्यांना आनंद मिळायचा आणि प्रत्येकाच्या अडचणीत ते खंबीरपणे पाठीशी उभे राहायचे. माझा मुलगा आशिष दिल्ली येथे केंद्रशासनाच्या सेवेत पंतप्रधान कार्यालयात महत्त्वाच्या पदावर विराजमान झाला या गोष्टीचा त्यांना खूप अभिमान वाटायचा. त्याचे लग्न झाले, नातसून ऋतुजा घरात आली, त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान, आनंद व कौतुक ही आमच्या कुटुंबासाठी खूप मोठी गोष्ट होती. ते गेल्यानंतर त्यांनी स्वतःच्याच हस्ताक्षरात लिहिलेले स्वतःच्या जीवन प्रवासाबद्दलचे तपशील असलेली डायरी सापडली. ज्यामध्ये त्यांनी स्वतःचा नियुक्ती आदेश क्रमांक, कोणत्या गावात कधी रुजू झाले, किती सेवा केली, सेवेतील अनुभव, महिन्याचा जमाखर्च, कोणत्या डोळ्याचे ऑपरेशन कधी झाले असे महत्त्वाचे तपशील सापडले. डायरी वाचताना अश्रू थांबत नव्हते, शब्द मनाला स्पर्शून जात होते.अक्षर मनात साठवावेसे वाटत होते. ते एक मार्गदर्शक, आधारवड आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनाने आमच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, मनाच्या एका कोपऱ्यात कायमची पोकळी निर्माण झाली आहे. ते नावाप्रमाणेच उत्तम माणूस होते. कर्तृत्व कसे असावे, कसे जगावे, कुटुंब कसे सांभाळावे याची शिकवण देत नकळतपणे ते आमच्यातून निघून गेले असले तरी त्यांनी दिलेली माणुसकीची संस्कारांची शिदोरी बरोबर घेऊन, त्यांच्या आठवणी मनात जपूनआम्ही पुढचं पाऊल टाकणार आहोत. कुटुंबातील सर्वांना दुःखातून बाहेर पडण्यासाठी व पुढे जाण्यासाठी ते आशीर्वाद देतील. परमेश्वर त्यांना आपल्या चरणी स्थान देऊन सद्गती देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**शब्दांकन-**
**डॉ.जयश्री राजीव देशमुख**
**कोषाध्यक्ष, अभिनव शिक्षण संस्था, अकोले**

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



श्री महाकालेश्वराचे अलौकिक दर्शन!
श्रावण मासानिमित्त भक्ती शक्ती मंदिरात, उज्जैनच्या श्री महाकालेश्वराचा प्रतिरूपाचे दर्शनाचा लाभ घ्यावा.
श्रावण मासारंभ निमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा !
भक्ती शक्ती मंदिर
डेरे फाउंडेशन कॅम्पस, कऱ्हे फाटा, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर
॥ ॐ नमः शिवाय ॥ ॥ श्री दत्तात्रेय नमः ॥ ॥ श्री विठ्ठल रुक्मिणी ॥

# नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांच्याकडून गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी

## खड्डे, पथदिवे आणि रस्त्यांच्या सुविधांचा आढावा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर, दि. २५ ऑगस्ट २०२६ : गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर संगमनेर शहरातील निश्चित करण्यात आलेल्या मिरवणूक मार्गाची नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुविधांचा आढावा घेतला. गणेश भक्तांना विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही त्रास होऊ नये, यासाठी रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजवणे, पथदिव्यांची व्यवस्था तसेच रस्ता सुव्यवस्थित करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या.

यासोबतच ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील नियोजित ठिकाणांचीही पाहणी करण्यात आली. सणांच्या काळात शहरात अनावश्यक गर्दी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी आवश्यक असलेला मार्ग खुला करण्यात आला असून, मार्गावरील खड्डे बुजवणे, पथदिवे सुरू करणे आणि रस्त्याची आवश्यक डागडुजी करण्याची कामे पूर्ण करण्यात येत आहेत. भाविकांना सुरक्षित आणि सुरळीतपणे मिरवणुकीत सहभागी होता यावे, यासाठी नगरपरिषद प्रशासनाकडून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. गणेशोत्सव सुरक्षित, आनंददायी आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा, यासाठी नगरपरिषद प्रशासन पूर्णपणे सज्ज असून नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे यांनी केले.

# सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेस आयएसओ मानांकन प्राप्त

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड या बँकेच्या कॉर्पोरेट ट्रेनिंग हॉलचे उद्घाटन मा. मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या शुभहस्ते पार पडले. याच कार्यक्रमांमध्ये नुकतेच बँकेला मिळालेल्या आयएसओ मानांकन बद्दल प्राप्त झालेल्या सर्टिफिकेटचे हस्तांतरण बँकेस करण्यात आले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँक लिमिटेड या बँकेला आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त झाल्या प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेने गुणवत्ता व्यवस्थापन प्रणालीच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला असून, बँकेला आंतरराष्ट्रीय दर्जाचे आयएसओ ९००१:२०१५ (ISO ९००१:२०१५) हे मानांकन प्राप्त झाले आहे. हे मानांकन बँकेच्या ग्राहक सेवा, कार्यपद्धती आणि अंतर्गत नियंत्रण प्रणालीच्या उच्च दर्जाचे निदर्शक आहे.



आयएसओ ९००१:२०१५ हे आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त गुणवत्ता व्यवस्थापन प्रणाली मानक आहे. हे मानांकन मिळाल्यामुळे हे अधोरेखित होते की संस्था, ग्राहकाभिमुख सेवा आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता, कार्यपद्धतींचे प्रमाणीकरण व एकसूत्रीकरण अंतर्गत नियंत्रण व जोखीम व्यवस्थापनातील सुधारणा,सातत्यपूर्ण सुधारणासाठी बांधिलकी, नियामक आणि भागधारकांचा वाढता विश्वास साध्य करताना दिसत आहे.

बँकेचे अध्यक्ष सुधाकर जोशी यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, हे मानांकन बँकेच्या संचालक मंडळ, व्यवस्थापन आणि सर्व कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. गुणवत्तापूर्ण सेवा देण्याच्या दिशेने बँकेने उचललेले हे पाऊल ठेवीदार, सभासद आणि ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ करेल, तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सुशासन व अंतर्गत नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत कार्यपद्धती राबविण्यासाठी बँक कटिबद्ध असल्याचेही त्यांनी नमूद केले. हे मानांकन प्राप्त झाल्यानंतर बँक आपल्या कार्यपद्धती, ग्राहक सेवा आणि तक्रार निवारण यंत्रणा अधिक सक्षम करण्यावर भर देणार आहे. सदर मानांकनाच्या अनुषंगाने वार्षिक अंतर्गत लेखापरीक्षण आणि पुनर्मूल्यांकन नियमितपणे केले जाईल, जेणेकरून गुणवत्तेचा हा दर्जा कायम राखता येईल.

सध्या बँकिंग व्यवस्था ही पूर्णपणे रिझर्व्ह बँकेच्या मापदंडाप्रमाणे कार्यरत आहेत आणि आपली बँक देखील याचे तंतोतंत पालन करत आहे. बँकेने व्यवसायामध्ये प्रगती साधताना गुणवत्ता देखील राखली असल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. बँकेने कार्पोरेट ट्रेनिंग हॉल तयार करून आणि आपल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या विषयांवर प्रशिक्षण देण्याचा चांगला उपक्रम हाती घेतला आहे. बँक विविध क्षेत्रांमध्ये करत असलेल्या सुधारणांबद्दल उपस्थितितांना अवगत केले. बँक डिजिटलायझेशन धोरण स्वीकारून, कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विविध विभागांमध्ये करताना ग्राहकांना जागतिक दर्जाच्या सुविधा या ग्रामीण भागांमध्ये उपलब्ध करून देत आहे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुजराथी यांनी नुकत्याच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तर्फे काढलेल्या परिपत्रकांचे बँक व्यवस्थापनाने अभ्यास करून त्याबाबतीत बँकेला धोरणांशी सुसंगत ठेवण्याचे काम केले असल्याचे सांगितले.

याच कार्यक्रमांमध्ये बँकेला आयएसओ मानांकन मिळवून देताना गेले कित्येक महिने याचे नेतृत्व करणाऱ्या अमोल घुले आणि विवेक सोनवणे या कर्मचाऱ्यांचा सत्कार लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी बँकेचे सर्व संचालक मंडळ, अमृत उद्योग समूहातील विविध संस्थांचे पदाधिकारी,तसेच बँकेचे ग्राहक आणि कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
- मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
- पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
- हेल्थ इंडिया इन्शुरन्स
- FHPL हेल्थ इन्शुरन्स
- इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
- बजाज आलियांज इन्शुरन्स
- एसबीआय जनरल इन्शुरन्स
- ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
- मेडसेव टीपीए प्रा.लि.
- जेनिन्स इंडिया टीपीए लि.
- ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
- टाटा एआयजी इन्शुरन्स
- रिलायन्स जनरल इन्शुरन्स
- मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
- चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
- नॅशनल इन्शुरन्स कं.
- न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
- निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
- युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
- स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
- दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
- एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
- युनायटेड हेल्थकेअर लि.
- Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
- मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
- एम.डी.इंडिया हेल्थकेअर
- विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
- पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# धनगरवाडीतील कार्यक्रमात राष्ट्रवादीला डावलल्याचा आरोप

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर -

राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे योगिराज गंगागिरी महाराज अखंड हरिनाम सप्ताहाच्या काल्याच्या कीर्तन कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थिती लावली. या सोहळ्यास महाराष्ट्राच्या विविध भागांतून लाखो भाविक उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी राज्यासह अहिल्यानगर जिल्ह्यासाठी विविध विकासकामे व नवीन योजनांबाबत वक्तव्य केले.

मात्र, राज्यात तीन पक्षांचे महायुती सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव कार्यक्रमात डावलण्यात आल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस हा महत्त्वाचा घटक असतानाही त्याच्या राजकीय सहभागाकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाल्याचे सांगण्यात आले. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने माजी पंचायत समिती सदस्य सरुनाथ उंबरकर यांनी भाजपचे आमदार विवेक कोल्हे यांचा निषेध केला. महायुती सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचा महत्त्वाचा सहभाग असताना राष्ट्रवादीच्या नेतृत्वाचा उल्लेख टाळणे हा पक्षाच्या कार्यकर्त्यांचा अवमान आहे, अशी भूमिका उंबरकर यांनी मांडली.

स्व. अजितदादा पवार यांनी अहिल्यानगर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. जिल्ह्यातील विविध विकासकामांना त्यांनी चालना दिली असून, त्यांच्या कार्याची दखल घेणे आवश्यक असल्याचेही उंबरकर यांनी नमूद केले. धनगरवाडीतील या भव्य धार्मिक सोहळ्यास लाखो भाविकांची उपस्थिती असताना राजकीयदृष्ट्याही हा कार्यक्रम चर्चेचा विषय ठरला आहे.

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस
ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

मार्स युनिव्हर्स प्रायव्हेट लिमिटेड
टूर्स, ट्रॅव्हल्स आणि कॉर्पोरेट सर्व्हिसेस
तुमचे पाऊल मंगळावर ठेवण्यासाठी मार्स युनिव्हर्स सज्ज
प्रति व्यक्ती 59,000/-* (फुकेत, बँकॉक)
प्रति व्यक्ती 79,000/-* (व्हिएतनाम, सिंगापूर, बाली)
आंतरराष्ट्रीय टूर पॅकेजेस | कॉर्पोरेट इव्हेंट मॅनेजमेंट | मिटींग्स, इन्सेंटिव्ह टूर्स | विश्वसनीय सेवा उत्तम नियोजन
1 ला ग्रुप - 26 सप्टेंबर
2 रा ग्रुप - 1 ऑक्टोबर
3 रा ग्रुप - 10 ऑक्टोबर
संपर्क - किशोर सोनवणे 9309429705

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25